# अमरावती शहर दैनंदिन गुन्हे अहवाल दिनांक २८/०१/२०२४

## खुनाचा प्रयत्नः-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | `सिटी कोतवाली अपराध क्र. 40/2024 कलम 385, 307, 323,504, 506,511, 34 भा.द.वि. | खत्री कॉम्प्लेक्स मनोहर पोपटानी यांचे अहुजा अकाऊंट न्सी दुकान अमरावती | दिनांक 28/01/2024 रोजी 14.00 ते 14.30 वा. दरम्यान<br><br>दिनांक 28/01/2024 रोजी 19.53 वा. | गौरव अमुतलाल मोटवाणी वय 20 वर्ष व्यवसाय-खाजगीजॉब रा.सिंधि कॅम्प न्यु टाउन बडनेरा अमरावती | चार अनोळखी इसम | .दि.28/01/2024 रोजी सकाळी नेहमी प्रमाणे आहुजा अंकाउन्टसी मध्ये खत्री कंम्पाउन्ट येथे काम करणे करीता सकाळी 12/00 वाजता आलो दुपारी 02/00 वाजता दरम्याण मला लघवी आल्याने मि दुकाना चे मागे लघवी करणे करीता गेलो असता तेथे थोड्या अंतरावर चार अनोळखी मुले दिसले.मि लघवी करीत असतांना ते चार मुल बंद दुकानाचे शटर वर उचलतांना दिसले म्हणुन मी त्याना हटकले असता त्या मधिल एका मुलाने मला दगड मारला म्हणुन मी त्या मुलाला म्हटले की दगड का मारला असे विचारले असता त्या मुलाने मला शिविगाळ करुन थापडानी मारहान केली मि त्या चार मुलान सोबत वाद न करता दुकानात(ऑफिस मध्ये) परत आलो व काम करायला सुरवात केली.अंदाजे दुपारी 02/30 वा दरम्याण पुन्हा ते चार अनोळखी मुल माझे ऑफिस मध्ये आले तेव्हा मी दुकानात एकटाच काम करीत होतो त्यानी मला म्हटले की तुझ्या मालकाला समजवुन सांग हे ऑफिस चालवायचे असेल तर तुझ्या मालकाने आम्हाला 10,000/- रु महिन्याचे द्यावे लागेल पैशै देत नसेल तर तुझ्या मालकाला येथे दुकान चालवीने कठिन होईल अशी त्यानी मला धमकी दिली.व शिविगाळ करायला सुरवात केली त्या चार पैकी एका मुलाने त्याचे हातात असलेली काचेची बियर ची बॉटल दुकानाच्या गेट ला मारुन फोडली व ईतर दोघांनी मला लाथ्या बुक्यानी मारहान केली एका मुलाने त्याचे हातात असलेल्या चाकुने मला जिवाने ठार मारण्याचे उद्देशाने माझे पोटावर मारण्याचा प्रयत्न करीत असतांना मि माझे बचाव करण्या करीता पलटल्याने माझ्या डाव्या पायाच्या मांडीवर चाकुने मारुन जख्मी केले माझे मांडीतुन रक्त निघत होते मि जोराने ओरडलो असता माझ्या बाजुला असलेले दुकानदार वरुन बत्रा,ओम वालेचा व ईतर दोन तिन लोक धावत आले तेव्हा ते चार मुल त्याना पाहुन पळुन गेले.माझ्या मांडीतुन रक्त निघत असल्याने माझे ऑफिस चा मुलगा शुभम काशेलानी यांने मोटर सायकल वर बसुन झेनिथ हॉस्पिटल येथे उपचारा करीता आणुन भरती केले.अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला **दाखल** |

## घरफांडी :—

| अ.क्र. | पो.ठाणे गु.र. नं. व कलम | धटनास्थळ | गुन्हा घडला ता.वेळ माहीती ता वेळ गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय संपर्क क्र | आरोपीचे नांव व पत्ता | गुन्हयाची थोडक्यात हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| २ | **सिटी कोतवाली** अपराध क्र. 39/2024 कलम 457, 380 भादवि | धर्मदाय कॉटन फंड काकाणी यांचे घर अमरावती | दि.27/01/2024 चे 21.00 वा ते दि.28/01/2024 चे 09.00 वा दा ता वे. दि.28/01/2024 चे 19.14 वा | अब्दुल मोबीन अब्दुल अनिस वय 29 वर्ष धंदा-ठेकेदार रा.बिस्मिल्ला नगर लालखडी अमरावती मो.न. | **अज्ञात** | दि.27/01/2024 रोजी दिवसभर काम करुन सांयकाळी 09/00 वाजता काम बंद करुन कामाचे साहीत्य व्यवस्थित बांधकामा वर ठेवुन घरी निघुन गेलो. दि.28/01/2024 रोजी सकाळी 09/00 वाजता नेहमी प्रमाणे मि व उमेदसिंग राजपुत असे आम्ही कामावर गेलो असता पहिल्या माळयाचे दरवाजा तुटलेला दिसला म्हणुन आम्ही दोघे पहिल्या माळया च्या आंत मध्ये ज्या ठिकाणी काम करण्याचे साहित्य ठेवले त्या ठिकाणी जावुन पाहले असता माझे टाईल्स कट करण्याचे डिवॉल्ट कंम्पणी चे कटल 3,गॅन्डर ४,मिक्सर मशिन २,ऑक्युरेट कंम्पणीचा कटर १ व ईतर चिल्लर सामान असे एकुन 35,000/-रु चे साहीत्य दिसुन आले नाही तसेच माझे सोबत फर्निचर चे काम करणारे उमेदसिंग राजपुत याचे सुध्दा फर्निचार कापण्याचे बॉश कंम्पनीचे कटर मशिन ४,गॅन्डर मशिन २,ड्रिल मशिन ३,टिम्बर मशिन छोटी व मोठी २ व ईसर कारपेन्टर सामान तसेच ईतर चिल्लर सामाण एकुन 55,000/-रु चे साहित्य दिसुन आले नाही तसेच घर मालक काकाणी यांनी त्याचे घरासाठी घेतलेले ड्रॉर चॅनल ४ सेट,इंन्जिस १६ नग व ईतर सामान असे एकुन 21000/-रु चे सामान दिसुन आले नाही.मि तसेच उमेदसिंग राजपुत व घर मालक नितिन काकाणी असे आम्ही आमचे साहीत्याचा आजु बाजु व ईतर ठिकाणी शोध घेतला मिळुन आले नाही.माझे तसेच कारपेन्टर उमेदसिंग राजपुत व घर मालक काकाणी याचे एकुन 1,11,000/-रु चे सामाण(साहित्य) कोनीतरी अज्ञात चोराने चोरुन नेले आहे.म्हणुन अज्ञात ईसमा विरुध्द कायदेशिर कार्यावाही करीता तक्रार देत आहे. माझा जबानी रिपोर्ट माझे सांगणे प्रमाणे मराठीत टंकलिखित केला असुन तो मला हिंन्दित वाचुन दाखवीला तो बरोबर आहे.अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

## वाहनचोरी :—

| अ.क्र. | पो.ठाणे गु.र. नं. व कलम | धटनास्थळ | गुन्हा घडला ता.वेळ माहीती ता वेळ गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय संपर्क क्र | आरोपीचे नांव व पत्ता | आरोपी अटक आहे/ नाही | गुन्हयाची थोडक्यात हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | नागपुरी गेट अप नं २८/२०२४ कलम ३७९ भादवी | जारानगर अकबर नगर जवळ अम | दि.२२.१.२०२४ चे ११.०० वा<br>दि.२८.०१.२०२४ चे १७.४९ वा | अवधूत भिमराव मनकाळे वय ४५ वर्ष रा हिवरा मूरादे ता नांदगाव खडेश्वर अमरावती | अज्ञात | नाही | हकिकत अशा प्रकारे आहे कि, माझा जवळ जूनी वापरती सप्लेन्डर प्रो गाडी क एम एच २७ बी ऐ १५९४ हि होती ती मी एक महीना अगोदर माझा मित्र शेख आसिक यास २०००० रू रपयाला विकली होती परतु गाडी ट्रान्सपफरचे कागद पत्र मी तयार केले नव्हते ती गाडी माझा नावानेच आहे दि २२/१/२०२४ रोजी रात्री ०९/३० वा दरम्यान माझा मित्र शेख आशिक हा त्याचे परीवारासह लग्नाचे कार्यक्रमाला गेला होता व त्याने माझी त्याला विकलेली गाडी जूनी वापरती सप्लेन्डर प्रो गाडी क प्रो एम एच २७ बी ऐ १५९४ रंग हिरवा पांढरे पट्टे असलेली इंजिन न एच ऐ १० ई एल डी डी एच एम ३९२२६ चेचीस न एम बी एल एच ऐ १०ऐ ३डी एच एम ०८७५३ किमंत २००००/ रू ची ही घरासमोर उभी करून ठेवली व लग्नाचे र्कायक्रमाले गेले व रात्री कार्यकम आटपून रात्री ११/०० घरी परत आले तर त्यांना त्याची ठेवलेल्या ठिकाणी दिसली नाही ती कोणी तरी अज्ञात चोराने चोरून नेली आहे अशी माहीती माझा मित्र शेख आशिक याने मला फोनव्दारे माहीती दिली होती माझा गाडी चा मी व माझा मित्र शेख आशिक यांनी आजपावेतो शोध घेतला मिळून आली नाही माझा गाडीचा शोध लागावा व गाडी मिळावी करीता रीर्पोट देत आहे अशा फीर्यादीचे जबानी रीर्पोट वरून सदरचा गुन्हा दाखल |

## स्त्रीअत्याचारः-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | नागपुरी गेट अप नं २७/२०२४ कलम ४९८अ, ३२३,५०४, ५०६,३४ भादवी | अम | दि.०९. १२०२०१५ चे १०.०० वा ते दि. २३.१०. २०२३ चे १९.२० वा<br><br>दि.२८.०१. २०२४ चे १४.१४ वा | **एक महिला** | १.इम्रान खान गफार खान वय २८ वर्ष<br>२.गफार खान मजीद खान<br>३.**एक महिला**<br><br>तिन्ही रा अम | हकिकत अशा प्रकारे आहे कि,यातील फिर्यादी व आरोपी हे एकमेकांचे नातेवाईक असुन आरोपी क्र १ याने दि २३.१०.२०२३ चे सायंकाळी ०६.०० वा ते ७.३०वा दरम्यान घरी येवुन त्यावेळेस आरोपी क्र २ व ३ घरी हजर असतांना त्यांनी संगनमत करून फिर्यादी सोबत भांडण्यास सुरवात केली व शिविगाळ करून घराबाहेर काढण्याची धमकी देवुन आरोपी क्र १ याने फिर्यादीला हाताने फिर्यादीचे गालावर चापट मारली वरून फिर्यादीने तिला माहेरी घेवुन जाणे करिता तिचे भावाला बोलाविले असता तिचा भाउ हा तिला नेण्याकरिता आला असता आरोपी क्र १ याने त्याला सुदृधा शिविगाळ करून फिर्यादीला तलाक तलाक तलाक म्हणुन तु मेरी बिवी नही है, घरसे निकल जा असे म्हणुन घराबाहेर हाकलुन दिले वरुन सदर प्रकरण कौटंबिक कलहाचे असल्याने समुपदेशकरिता महिला सहायक कक्ष येथे तडजोड न झाल्याने फिर्यादीने दिलेल्या जबाणी रिपोंट वरून तसेच भरोसा सेल अमरावती दि.२५७०१६२०२४ अन्वये प्राप्त कार्यालयीन पत्रावरून तसेच वरिष्ठांचे आदेशावरून सदरचा गुन्हा दाखल |

फसवणुकः-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | **पोस्टे सिटी कोतवाली** अपराध क्र. 38/2024 कलम 420,419 भा.द.वि. सह सह कलम 3, 5 चिन्ह आणि नाव (अयोग्य वापर प्रतिबंध) अधिनियम 1950 अन्वये | अमरावती | **अपराध घ.ता.वेळ :-** दिनांक 22/09/2023 रोजी 13.00 ते दिनांक 29/10/2023 रोजी पर्यंत **अपराध दाखल ता.वेळ :-** दिनांक 28/01/2024 रोजी १६.११ वा. | **एक महिला** | प्रतिक संजय देवरे, वय अंदाजे 36 वर्ष, रा. पुणे | हकिकत फिर्यादीने पोलीस स्टेशनला येऊन रिपोर्ट दिला की, जिवनसाथी या वेबसाईटवर रेजिस्ट्रेशन केले होते.त्यानंतर डिसेंबर 2022 मध्ये जिवन साथी या वेबसाईटच्या माध्यमातुन प्रतिक संजय देवरे रा. पुणे या व्यक्तीने यावरुन मला संपर्क साधुन माझ्यासोबत लग्नाबाबत बोलणी केली होती तेव्हा मी त्याच्या सोबत लग्न करण्यास त्याला नकार दिला होता. त्यानंतर त्याचा आणि माझा कधीही संबध आला नाही. प्रतिक संजय देवरे, रा. पुणे याने दिनांक 14/09/2023 रोजी मला व्हॉट्सपव्दारे मॅसेज पाठवुन संपर्क साधला तेव्हा माझे लग्न झालेले असल्याचे मी त्याला सांगितले होते तो मला सारखा सारखा मॅसेज पाठवुन माझ्याशी संपर्क साधत होता आणि तो स्वामी प्लाज्मा, पाथर्डी फाटा, नाशिक या कंपनीचा प्रोप्रायटर असुन सदर कंपनीत पैसे गुंतविल्यास जास्त परतावा मिळवुन देतो असे मला सांगितले आणि माझा विश्वास संपादन केला.तसेच तो त्याच्या कंपनीची माहिती देण्यासाठी दिनांक 22/09/2023रोजी दुपारी 01.00 वाजताच्या सुमारास, अमरावती येथे आला आणि सदर ठिकाणी मला भेटुन त्याने मला स्वामी प्लाज्मा कंपनीची माहिती दिली आणि तो कंपनीचा मालक असल्याचे सांगुन त्याच्या कंपनीमध्ये हजारो डॉक्टरांनी पैसे गुंतवले असुन त्यांना त्या पैशाच्या मोबदल्यात भरपूर परतावा दिला असल्याचे सांगुन मला विश्वासात घेवुन त्याच्या कंपनीचे दाखविला.त्याच्या कंपनीत गुंतविण्यासाठी माझ्याकडे तीन लाख रुपयांची मागणी केली. मी त्याला तीन लाख रुपये रक्कम देण्यापुर्वीच त्याने माझा विश्वास संपादन करण्यासाठी दिनांक 22/09/2023 रोजी मला 35,000/-रु. चा स्वामी प्लाज्मा नावाच्या ॲक्सिस बँक अकाउंटचा चेक दिला माझी फसवणुक करण्याच्या उद्देशाने प्रतिक संजय देवरे, वय अंदाजे 36 वर्ष, रा. पुणे याने त्याचा यावरुन माझ्याशी संपर्क साधुन तो इंटर नॅशनल ह्युमन राईटचा अध्यक्ष असल्याचे व स्वामी प्लाज्मा कंपनीचा मालक असल्याचे सांगुन त्याच्या स्वामी प्लाज्मा कंपनीत गुंतविण्यासाठी माझ्याकडुन 3,80,000/-रु. घेऊन मला सदर रक्कमेचा परतावा व मुळ रक्कम परत न देता माझी फसवणुक केली आहे. |

**ईतर :-**

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | नांदगावपेठ अप क्र. ३३/२०२४ कलम ११(१)(ड) प्राण्याचा छळ प्रती.अधी.१९६० सहकलम ११९ मपोका | रहाटगाव चौक अमरावती | दि.२८/०१/२०२४ चे १६/०० वा.<br><br>दाखल ता.वेळ दि.२८/०१/२०२४ चे १७/१३ वा. | सरतर्फे गजानन लोकडे सा.पो.स्टे. नादगावपेठ | निलेस मधुकरराव जावरकर वय ३५ वर्ष रा.तळेगाव मोहना ता.चादुर बाजार जि.अमरावती | हकिकत अशा प्रकारे आहे की, वरिल विषयान्वये फिर्याद देतो की.आज रोजी दुपारी अंदाजे १६/०० वा.दरम्यान गुप्त बातमी दाराकडुन माहीती दिली की, एक आयसर गाडी रहाटगाव चौकात उभी असुन त्यामध्ये गौवश असल्याबाबत सांगीतले.वरुन आम्ही व पो.स्टॉप रहाटगाव चौक येथे पुलाचे बाधकाम सुरु असलेल्या ठिकाणी जावुन पाहीले.त्या ठिकाणी एक केशरी रंगाचा आयसर गाडी क्र.एम एच ३० बि.बि.३८५३ उभा असलेला दिसला.त्यावर ताडपत्री टाकलेली होती.ती ताडपत्री काढुन पाहणी केली असता त्यामध्ये म्हैस जातीचे २० जनावरे निर्दयतेने क्रुरुरतेने कोंबुन बाधुन असल्याचे दिसले.सदर आयसर गाडी चालकास त्याचे नाव गाव विचारले असता त्याने त्याचे नाव निलेश मधुकर जावरकर वय ३५ वर्ष रा.तळेगाव मोहना ता.चादुर बाजार जि.अमरावती असे सांगितले.नमुद वाहन चालकाने त्याचे गाडीमध्ये प्राण्याना निर्दयतेने व क्रुरुतेने कोंबुन वाहतुक केली आहे.त्याचेवर नमुद कायदेशीर होण्यासाठी मी कायदेशीर फिर्याद देत आहे. |
| २ | पोलीस स्टेशन गाडगेनर अमरावती अपक्र. १०३/२४ कलम- २९४,३२३, ५०४,३४ भादवी | शोभा नगर अमरावती | गु.घटना ता व वेळ दि. २८.१.२४ चे १२.०० वा माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ दि. २८.१.२४ चे १६.०५ वा | निलेश महादेव ओगटे वय- ४३ रा. शोभा नगर मंदीराजवळ अमरावती | १. नितीन महादेव ओगटे वय-४६<br>२. एक महिला | हकीकत अशा प्रकारे आहे की, नमुद घतावेळी व ठिकानी यातील फिर्यादी व आरोपी हे एकमेकाचे नातेवाईक असुन तो भाउ आहे व शेजारी राहतात त्याच्या घरामध्ये सरकारी नळ आहे फिर्यादी च्या नळ चौक झाल्याने फिर्यादीने दोन मंजुर सांगुन काम सुरु केले असता आरोपी क्र.१ने फिर्यादीस शिवागाळ केली फिर्यादीस शिवागीळ एकाला आली असता ते घरातुन बाहेर आले व आरोपी ने फिर्यादीच्या अमगावर मारायला आले तेव्हा फिर्यादी ची पत्नी ही मध्ये आली असता तिला आरोपी क्र.२ ने अश्लीन शिवागाळ केली फिर्यादीस आरोपी चा नेहमीच त्रास आहे .अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल. |

## अकस्मात मृत्यु :-

| अ.क्र. | पो.ठाणे मर्ग.क्र. व कलम | घटना स्थळ | मृतकाचे नांव | फिर्यादी | मरणाचे कारण | अकस्मात मृत्यूचे विवरण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पो ठाणे बडनेरा मर्ग क्र ०६/२०२४ कलम १७४ जा फौ | राहत्या घरी पाच बंगला जुनी वस्ती बडनेरा | एक महिला | सुरज रवि साखरे वय ३१वर्षे रा पाचबंगला जुनी वस्ती बडनेरा | गळफास घेवुन आत्महत्या | हकीकत अशा प्रकारे आहे की यातील दि २८/०१/२०२४ रोजी १३.३० वा फि ची आई व बहीन ही दवाखान्यातुन घरी परत आल्या तर घराचे दार बंद होते दार ठोकले पण आतुल उत्तर आले नाही म्हणुन त्यानी खीडकीतुन पाहनी केली तर**मृतक** ही ओढणी (दुपट्टा) गळ्याला बाधुन सिलींग फॅन ला लटकलेली दिसली फि मोठी बहीनीने फि दिला फोन करुन घरी बोलावले व लटकलेल्या बहीनीला उतरुन दवाखान्यात नेले तर डॉ. सा नी चेक करुन मृत घोषीत केले तिने आत्महत्या कली वर माझा कोणावरही सशय नाही अशा फिचे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा मर्ग दाखल |

## प्रोव्हीशनः—

| अ. क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | भेट देणारे अधि. व वेळ | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पो स्टे फ्रेजरपुरा अमरावती शहर | अप क्र ७८/२० २४ कलम ६५(ई) मदाका | महादेव खोरी बागळै ले आउट अमरावती | दि. २८. ०१. २०२४ चे १२. ३५वा दरम्यान | दाखल ता वेळ २८/ ०१/ २०२ ४ चें १४. २४वा | पो हे का सुनील सोळंके बं न २८९ पो स्टे फ्रेजरपुरा अमरावती शहर | मोहन सहदेव रामटेके वय ५२ वर्ष रा. महादेव खोरी बागळै ले आउट अमरावती आरोपीवर पो.स्टे. अभिलेखावर - अप.क्र. ६५/२४, १०९३/२३, ७९७/२३, ७३७/२३ कलम ६५(ई) म.द.का.चे दाखल आहेत. | दाखल अधिकारी . पोउपनी विजय गिते पो स्टे फ्रेजरपुरा अमरावती शहर | हकिकत अशा प्रकारे आहे कि यातिल नमुद घ ता वेळी व ठिकानी फिर्यादी पो स्टॉप सह पो स्टे परीसरा पेट्रोलींग करीत असताना गुप्त बातमीदाराकडुन खात्री लायक माहीती मिळीलयावरून नमुद आरोपीवर प्रो रेड केली असता त्याचे ताब्यातुन ११ नग देशी दारु बॉबी संत्रा प्रत्येकी १८० एम एल च्या सिलबंद पावटया ७७०/रु रू चा प्रोव्ही माल पंचासमक्ष जप्त करुन ताब्यात घेतला अशा फिर्यादीच्या लेखी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल |
| २ | खोलापुरी गेट | 26/2024 कलम ६५(ई)म | अमरावती | 28/01/ 2024 चे | दाखल ता वेळ 28/01 | सरतर्फ पोहेकॉं राम लोखंडे ब.न.1114 पो | एक महिला | तपासी अधिकारी- पोउपनी प्रदीप | हकीकत अशा प्रकारे आहे की,यातील फिर्यादी हे पो स्टॉंपसह पो स्टे हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना गुप्त बातमी दाराकडुन खात्रीलायक माहीती मिळाली की, अमरावती येथे एक महीला तिचे राहते घरासमोर अवैध्य देशी दारु बाळगुन |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | दाका | | 19/20 वा ते 19/50 वा सुमारास | /2023 चे 20/35 वाजता | स्टे खोलापुरी गेट अमरावती | | होळहे पो स्टे खोलापुरी गेट अमरावती शहर अधिने भेट ता वेळ- 28/01/2024 चे 20/45 वाजा ते 21/00 वा सुमारास | चोरीने विक्री करीत आहे.त्यावरुन नमुद घटना ता वेळी व ठिकाणी सदर महीलेवर पंचासमक्ष प्रो रेड केला असता महीलेच्या हातातील पिशवीमध्ये देशी दारु बाँबी संत्रा कंपनिच्या प्रत्येकी 180 मी ली च्या 09 नग सिलबंद पावट्या कि.अं.630/-रुपयेचा प्रो ाल पंचासमक्ष मिळुन आला सदरचा माल पंचासमक्ष जप्त करुन ताब्यात घेतला.नमुद आरोपी यांचे विरुध्द सदरचा गुन्हा दाखल करण्यात आला. दाखल अधिकारी. नापोकाँ विनोद टेंभुर्णे ब.न.1437 पो स्टे खोलापुरी गेट |